प्र.१ अ) 'वाङ्मय' ही संकल्पना स्पष्ट करुन वा. ल. कुलकर्णी यांची ललित वाङ्मयाची भुमिका त्यांच्या 'ललित वाङ्मयाची प्रकृती' या निबंधाच्या आधारे सविस्तर लिहा. (१५)

**किंवा**

ब) "साहित्यकृतीच्या संहितेद्वारे अर्थनिर्मितीची होणारी प्रक्रिया लेखक भालचंद्र नेमाडे यांनी कशा प्रकारे मांडली आहे." ते साधार लिहा.

प्र.२ अ) "सौंदर्य हे केवळ घाटात नसून आशयातही असते." लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या 'साहित्याचे मूल्यमापन' या निबंधाच्या आधारे सविस्तर स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

ब) "कवितेत कवी स्वत:च्या अनुभूतीचा स्वत:च ठाव घेत असतो." तुम्ही अभ्यासलेल्या कुसुमावती देशपांडे यांच्या निबंधाच्या आधारे सविस्तर लिहा.

प्र.३ अ) 'आस्वाद' म्हणजे काय ते सांगून त्याचे समीक्षेशी असलेले नाते गंगाधर पाटील यांच्या 'साहित्य-समीक्षेचे स्वरुप' या निबंधाच्या आधारे साधार लिहा. (१५)

**किंवा**

ब) "पु.शि.रेगे यांची 'सावित्री' कादंबरी प्रेमानुभव व्यक्त करणारी आधुनिक कादंबरी आहे." या विधानाचा परामर्श सरोजिनी वैद्य यांच्या समीक्षेच्या आधारे घ्या.

प्र.४ टीपा लिहा. (प्रत्येक गटातील एक) (५)

अ) साहित्य आणि समाज यामधील नाते

**किंवा**

साहित्यकृतीतील 'वास्तवसृष्टी'

ब) साहित्याची निर्मितीप्रक्रिया (५)

**किंवा**

काव्यातील काव्यानुभव

क) 'ऐक जरा ना' कवितेचे रसग्रहण (५)

**किंवा**

'सावित्री' कादंबरीतील पत्रे

प्र.५ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पंधरा) (१५)

१. साहित्याचे माध्यम कोणते ?

२. 'साहित्य: स्वरुप आणि समीक्षा' या पुस्तकाच्या लेखकाचे नाव लिहा.

३. 'फुलराणी' या कवितेच्या कवीचे नाव लिहा.

OP3ACB

४. साहित्यकृती ही कशाची नवनिर्मिती असते?

५. साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य लिहा.

६. साहित्यातून काय 'सूचित' केले जाते?

७. 'पिपात मेले ओल्या उंदीर' या कवितेच्या कवीचे नाव लिहा.

८. 'भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली.' या कवितेच्या ओळी कोणी लिहिल्या आहेत?

९. साहित्यकृतीची तीन अंगे लिहा.

१०. सौंदर्यवादी भूमिका कोणी मांडली?

११. 'ऐक जरा ना' या कवितेवरील गंगाधर पाटील यांनी लिहिलेल्या निबंधात कोणत्या संकल्पनांचे उपयोजन केले आहे?

१२. मेटॅफर आणि मेटॅनिमी या संकल्पना कोणी मांडल्या?

१३. स्वप्नसिद्धांत कोणी मांडला?

१४. 'साहित्यकृतीचा अर्थव्यापार' हा निबंध कोणत्या पुस्तकातून घेतला आहे?

१५. 'साहित्याची भाषा' हे पुस्तक कोणी लिहिले आहे?

१६. एक सुसंघटित संरचना कशाला म्हटले जाते?

१७. प्रेरणा संतुलनाची संकल्पना कोणी मांडली?

१८. 'सावित्री' कादंबरी कोणी लिहिली?

❀❀❀